मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली राज्यात कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर दोन नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन निर्णय क्रमांक:- याचिका २०१९/प्रक्र.५१/सामासू

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०००३२,
दिनांक :- ०८ मार्च, २०१९

**संदर्भ:-** १. शासन निर्णय ,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीएसडब्ल्यु १०९९/प्र.क्र.२३२/सुधार-१ दिनांक १० एप्रिल, २००१.

२. शासन निर्णय ,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीएसडब्ल्यू २००२/प्र.क्र.३६३/भाग-२/सुधार-१, दिनांक २४ ऑगस्ट,२००४.

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र. न्यायप्र-२०१७/प्र.क्र. ३६७/सामासु दि. १६/०३/२०१८

४. मा.उच्च न्यायालय, नागपूर यांचे दि.२०/०७/२०१८ रोजीचे आदेश

५. मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.८/२/२०१९ रोजीचे आदेश

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागातंर्गत एकूण ५२ मान्यताप्राप्त समाजकार्य महाविद्यालये असून सद्य:स्थितीत ५० समाजकार्य महाविद्यालये अनुदान तत्वावर कार्यरत आहेत, १ समाजकार्य महाविद्यालय बंद असून व १ समाजकार्य महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर कार्यरत आहे. या सर्व महाविद्यालयांचे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ वरील तरतूदीनुसार संलग्निकरणाची कार्यवाही करण्यात येत असली, तरी मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि.२४/८/२००४ च्या शासन निर्णयान्वये BSW/MSW या अभ्यासक्रमांना विनाअनुदान किंवा अनुदान तत्वावर मान्यता न देण्याचा तसेच नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता न देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.२०/७/२०१५ अन्वये नियुक्त केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालानुसार नविन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ यांच्या शिफारशीनुसार कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देण्याबाबत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे शासना विरुध्द स्व. श्री. ज्ञानेश्वरजी मेंघरे बहुउद्देशिय शिक्षण संस्था,नागपूर यांनी याचिका क्र.२५७३ /२०१८ व कै.माणिकराव गोविंदराव खडसे ग्रामिण विकास संस्था, रोहिणी, ता.देवळी, जि.वर्धा यांनी याचिका क्र. २४४०/२०१८ दाखल केली होती. उपरोक्त संस्थांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याचा मा.उच्च न्यायालय,नागपूर यांनी दि.२०/७/२०१८ च्या आदेशान्वये न्यायनिर्णय दिला होता. मा.उच्च

न्यायालयाच्या सदर निर्णया विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यास सह सचिव (विधी),नागपूर यांनी दि. २७/८/२०१८ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे शासनाच्या वतीने दि.८/१/२०१९ रोजी SLP (विशेष अनुज्ञाप्ती याचिका) क्र.११४५/२०१९ दाखल करण्यात आली होती. तथापि सदरचे अपिल मा.सर्वोच्च फेटाळल्यामुळे स्व. श्री. ज्ञानेश्वरजी मेंघरे बहुउद्देशिय शिक्षण संस्था,नागपूर यांनी (यांचिका क्र.२५७३ /२०१८) व कै.माणिकराव गोविंदराव खडसे ग्रामिण विकास संस्था, रोहिणी, ता.देवळी, जि.वर्धा यांनी (याचिका २४४०/२०१८) दाखल केलेल्या याचिके प्रकरणी मा.उच्च न्यायालय,नागपूर यांनी दि.२०/७/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार तसेच मा.मंत्रीमंडळाच्या दि. ८ /३/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार उपरोक्त संस्थेस कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

**शासन निर्णय :**

मा.उच्च न्यायालय,नागपूर येथे स्व. श्री. ज्ञानेश्वरजी मेंघरे बहुउद्देशिय शिक्षण संस्था,नागपूर यांनी दाखल केलेली याचिका क्र. २५७३ /२०१८ व कै.माणिकराव गोविंदराव खडसे ग्रामिण विकास संस्था, रोहिणी, ता.देवळी, जि.वर्धा यांनी दाखल केलेली याचिका क्र.२४४०/२०१८ या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालय,नागपूर यांनी दि.२०/७/२०१८ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे व त्यानुसार सामाजिक न्याय विभागास खालीलप्रमाणे कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

"We find that the petitioners do not seek any financial assistance from the respondent Nos. १ to ३¤ We quash and set aside the impugned orders dated १६th March, २०१८ and direct the respondents to grant permission to the respective Petitioner-society as asked for within next two weeks. "

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या सदर न्यायनिर्णयाची पुर्तता करण्यासाठी, तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने, मा.उच्च न्यायालय,नागपूर यांचा दि.२०/७/२०१८ रोजीचा न्यायनिर्णय कायम ठेवला आहे, ही बाब विचारात घेवून सदर दोन्ही संस्थेस कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता ही कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर आहे. उपरोक्त दोन्ही संस्थांना भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करता येणार नाही, हया अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.

३. समाजकार्य महाविद्यालय स्थापन करण्यासाठी लागणा-या इतर सर्व अटी व शर्ती यांची पूर्तता उपरोक्त समाजकार्य महाविद्यालयांनी केली आहे, याची खात्री आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी करावी.

४. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपरोक्त दोन समाजकार्य महाविद्यालयास मान्यता देण्यात येत असल्याने, शासनाच्या धोरणात कोणताही बदल नाही. यास्तव संदर्भाधिन क्रमांक १ व २ येथील अनुक्रमे दि.१०.०४.२००१ व दि.२४.०८.२००४ रोजीचे शासन निर्णय यापुढेही लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि. ८/३/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३१०१७५७४०७०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032, street=151 ANNEX,1ST FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=fc344849650ce07c3f9adc7e2cd4976b2852065e2acd65f7cee1828c10091458, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DINGLE DINESH RAMCHANDRA
Date: 2019.03.10 17:59:45 +05'30'

**( दि. रा. डिंगळे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अ.मु.स./प्र.सचिव/सचिव,मंत्रालय मुंबई
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा) महाराष्ट्र,मुंबई/नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी,सर्व
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१२. आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
१६. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१७. निवडनस्ती